| | |
|---|---|
| MHJN040014812016 | दाखल तारीख : १७/१०/२०१६<br>नोंदणी तारीख : १७/१०/२०१६<br>निकाल दिनांक : १८/०५/२०२६<br>कालावधी : व म. दिवस.<br>०९ ०७ ०१ |

**भाग–अ** **नि.क्र. २०**

| | |
|---|---|
| | **न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, न्यायालय क्र.२ अंबड, जि. जालना यांचे न्यायालयात**<br><br>**पिठासीन अधिकारी – श्रीमती एस.एच. राठी**<br>**(जाहिर दिनांक १८/०५/२०२६)**<br><br>**नियमित फौजदारी खटला क्र.२६१/२०१६** |
| | गुन्हा नं.७६/२०१५<br>पोलीस ठाणे – गोंदी, ता. अंबड, जि. जालना. |
| **फिर्यादी** | **महाराष्ट्र सरकारतर्फे,**<br>पोलीस स्टेशन गोंदी, ता. अंबड, जि. जालना. |
| **प्रस्तुत** | श्रीमती. आर. एस. जाधव सहाय्यक सरकारी अभियोक्ता. |
| **आरोपी** | **नौशाद कासम पठाण,**<br>वय २४ वर्ष, धंदा –<br>रा. पिंपळवाडी, ता. पैठण. जि. औरंगाबाद |
| **प्रस्तुत** | श्री. एस. ए. मुळे, विधिज्ञ आरोपीकरीता. |

**भाग–ब**

| | |
|---|---|
| **गुन्हा घडल्याची तारीख** | २२/०५/२०१५ |
| **एफ.आय.आर. दिनांक** | २३/०५/२०१५ |
| **दोषारोपपत्र दाखल दिनांक** | २२/०७/२०१५ |
| **दोषारोप ठेवल्याचा दिनांक** | ३०/०८/२०१८ |
| **पुरावा सुरु झाल्याचा दिनांक** | ०९/१२/२०१९ |
| **न्यायनिर्णय राखीव ठेवल्याचा दिनांक** | –– |
| **निकाल जाहिर दिनांक** | १८/०५/२०२६ |
| **शिक्षा दिली असेल तो दिनांक** | –– |

## आरोपीचे तपशील

| आरोपी क्र. | आरोपीचे नाव | अटकेची तारीख | जामीनावर सुटल्याची तारीख | आरोपीवर गुन्हा | निर्दोष किंवा दोषी | शिक्षा ठोठावली | कलम ४२८ फौ.प्रक्रिया संहिताप्रमाणे अटकेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | **नौशाद कासम पठाण,** | ०२.०६.२०१५ | ०२.०६.२०१५ | भारतीय दंड विधान ३७९ अन्वये व गौ.ख.का ३ व ४ | निर्दोष मुक्तता | – | – |

## भाग–क

## साक्षीदार यादी – सरकार/बचाव व न्यायालय

### अ – सरकार

| क्रमांक | नांव | साक्षीदाराचे स्वरुप (प्रत्यक्षदर्शीय, पोलीस, तज्ञ, वैदयकिय, पंच व इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| सा.क्र.१ | आदिनाथ देविदास बोंदे | पंच |
| सा.क्र.२ | शेख रफीक शेख यासीन | पंच |

## सरकार पक्षाची यादी/ बचाव / न्यायालयाकडून दिलेले निशाणी

### अ– सरकार

| अनु क्रमांक | निशाणी क्रमांक | विवरण |
|---|---|---|
| १. | निशाणी क्र.१४ व १५ | पंचनामा |

### ब – बचाव

| अनु क्रमांक | निशाणी क्रमांक | विवरण |
|---|---|---|
| – | – | – |

### क– न्यायालयाकडून दिलेले निशाणी

| अनु क्रमांक | निशाणी क्रमांक | विवरण |
|---|---|---|
| १ | निशाणी क्र.१३ | दोषारोप |
| २ | निशाणी क्र.१४ | आरोपीचे निवेदन |

### ड – प्रदर्शित ऑब्जेक्ट्स (M O ) :–

| अनु क्रमांक | निशाणी क्रमांक | विवरण |
|---|---|---|
| – | – | – |

<u>न्या य नि र्ण य</u>

(दिनांक १८ मे, २०२६ रोजी पारीत)

आरोपीविरुध्द भारतीय दंड संहिता कलम ३७९ व गौण खनिज कायदा कलम ३ व ४ अन्वये शिक्षापात्र गुन्हयासाठी संपरिक्षा चालविण्यात आली.

२. **अभियोग पक्षाचे कथन सारांशाने पुढील प्रमाणे –**

फिर्यादी श्रीपाद गंगाधर मोताळे मंडळ अधिकारी, काटी गोंदी यांनी अशी फिर्याद दिली की, दि. २२.०५.२०१५ रोजी रात्री १०.०० वाजेच्या सुमारास तहसिलदार यांनी कळविले की, मौजे साष्टपिंपळगाव येथे गोदावरी नदी पात्रातून अवैध वाळू वाहतूक करताना एक निळ्या रंगाचा हायवा ट्रक क्र. एम.एच.१६–ऐ.ई.९९११ एक निळ्या रंगाचा हायवा हे वाहन गोंदी पोलीस स्टेशन येथे लावण्यात आले असून तुम्ही पोलीस स्टेशनला जाऊन फिर्याद दाखल करण्याचे पत्र दि.२३.०५.२०१५ रोजी प्राप्त झाले. त्यावरून ते पोलीस स्टेशन, गोंदी येथे येऊन सदर वाहनांची पाहणी केली असता सदर ट्रक मध्ये ६ बास वाळू दिसून आली. अशी फिर्यादी त्यांनी वाहनाच्या मालकाविरूध्द पोलिस स्टेशन, गोंदी येथे फिर्याद दिली.

३. सदरच्या फिर्यादीवरुन पो.हे.कॉ/४०३ एन. एम. सैय्यद यांनी आरोपीविरुध्द भारतीय दंड विधान कलम ३७९ व गौण खनिज कायदा कलम ३ व ४ अन्वये गुन्हा क्र. ७६/२०१५ नोंदविण्यात आला. गुन्ह्यात तपास तपासिक अंमलदार पो.हे.कॉ/४०३ एन. एम. सैय्यद यांच्याकडेच देण्यात आला. तपासादरम्यान तपासीक अधिकारी यांनी घटनास्थळ व जप्ती पंचनामा तयार केला, साक्षीदारांचे जबाब नोंदविले व तपास पुर्ण करून अन्वेषणाअंती आरोपी विरूध्द दोषारोपपत्र न्यायालयात सादर केले आहे.

४. आरोपी विरुध्द निशाणी क्र. १३ वर कलम ३७९ व गौण खनिज

कायदा कलम ३ व ४ अन्वये दोषारोप निश्चित केले त्यात त्याने गुन्हा नाकबूल करून संपरिक्षेस निशाणी क्र.१४ वर प्रकरण समोर करण्यास विनंती केली.

**५.** अभियोग पक्षाचे मुख्य साक्षीदार फिर्यादी यांची साक्ष अभियोग पक्षास लाभलेली नाही. अभियोग पक्षाने आरोपीविरुध्द गुन्हा सिध्द करण्याकरिता साक्षीदार क्र. १ आदिनाथ देविदास बोंदे यांना नि. क्र. १३ व साक्षीदार क्र.२ शेख रफीक शेख यासीन (पंच) यांना नि.क्र. १५ वर तपासण्यात आले. इतर साक्षीदारांना समन्स काढूनही ते पुराव्याकामी हजर झालेले नाहीत. अभिलेखावर आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ प्रमाणे जबाब नोंदविण्यात आले नाही. त्यांनी त्यांच्या बचावात खोटे आरोप असल्याने कथन केले.

**६.** अभियोग पक्षातर्फे सरकारी वकील श्रीमती. आर. एस. जाधव यांचे दोषारोपपत्रानुसार युक्तीवाद येकण्यात आला. आरोपी व त्यांचे विधिज्ञ गैरहजर असल्याने त्यांच्यातर्फे युक्तीवाद ऐकण्यात आलेला नाही.

**७.** दोषारोपत्रावरुन विचारार्थ निघालेले प्रश्न व त्यावरील माझे निष्कर्ष सविस्तर कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे आहे.

| **अ.क्रं.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १ | अभियोग पक्ष सिध्द करतो काय की, दि.२२/०५/२०१५ रोजी २२.०० वा. च्या दरम्यान मौजे साष्टपिंपळगा, ता. अंबड. जि. जालना येथे आरोपीने हायवा ट्रक क्रमांक एम.एच.१६. ए.ई.९९११ सहाय्याने स्वतःच्या फायद्यासाठी सहा ब्रास वाळू चोरून वाहनामध्ये भरून चोरटी विक्री करण्याच्या उद्देशाने घेवून जात असताना मिळून आले व त्याअन्वये आरोपीनी भारतीय दंड संहिता कलम ३७९ अन्वये गुन्हा केला ? | नाही |
| २ | अभियोग पक्ष सिध्द करतो काय की, उरोक्त दिवशी, वेळी व ठिकाणी आरोपीने विनापरवाना विना रॉयल्टी वाळू वाहनामध्ये भरून चोरटी विक्री करण्याच्या उद्देशाने संमतीशिवाय घेवून जाण्याच्या उद्देशाने मिळून आले व अन्वये गौण खजिन कायदा | नाही |

कलम ३ व ४ अन्वये गुन्हा केला ?

३ आदेश काय ? अंतिम आदेशाप्रमाणे

## <u>कारणमिमांसा</u>

**<u>बाब क्र. १ व २ करीताः–</u>**

८. साक्षीदार क्र. १ आदिनाथ देविदास बोंदे व साक्षीदार क्र.२ शेख रफीक शेख यासीन यांनी त्यांच्या पुराव्यामध्ये सांगितले की, ते आरोपीला ओळखत नाही, पोलीसांनी दि.२३.०५.२०१५ रोजी पंचनाम्यासाठी बोलाविले होते व त्यांची गोंदी फाट्यावर सही घेतली परंतु, त्यातील मजकुर माहित नसल्याचे कथन केले. परंतु, त्यातील मजकुर माहित नसल्याचे कथन केले आहे. त्यामुळे अभियोग पक्षातर्फे त्यांना उत्तरसुचक प्रश्न विचारण्यात आले परंतु त्यांनी अभियोग पक्षाला अभिलेखावरील पंचनामा सिध्द होईल असे पुरावे देवुन सहकार्य केलेले नाही.

९. अभिलेखावर आलेल्या पुराव्याचे अवलोकन केले असता, अभियोग पक्षाने खटल्यातील पंच साक्षीदार यांना तपासले परंतू त्यांच्या पुराव्यादरम्यान अभिलेखावरील घटनास्थळ पंचनामा सिध्द झालेला नाही. अभियोग पक्षाला फिर्यादी व साक्षीदारांची उपस्थिती लाभलेली नाही त्यामुळे अभिलेखावरील फिर्याद व इतर दस्त सिध्द झालेले नाही. अभिलेखावर आलेल्या पुराव्यातून आरोपीला दोषी ग्राह्य धरणे इतपत पुरावा मिळून आलेले नाही. अशा स्थितीत आरोपीविरुध्द लावण्यात आलेले आरोप सिध्द झालेले नाहीत. सबब मी मुद्दा क्र. १ व २ चे उत्तर नकारार्थी नोंदवून मुद्दा क्र. ३ करीता खालील आदेश पारीत करीत आहे.

## <u>आ दे श</u>

१. आरोपी **नौशाद कासम पठाण,** रा. पिंपळवाडी, ता. पैठण. जि. औरंगाबाद यास भारतीय दंड विधानाचे कलम ३७९ व गौण खनिज कायदा कलम ३ व ४ अन्वयेच्या गुन्हयातुन फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम २४८(१) अन्वये दोषमुक्त करण्यात येत आहे.

२. आरोपीचे वैयक्तीक बंधपत्र व जमानत रद्द करण्यात येत आहे.

३. आरोपीने रु. २५,०००/-चे वैयक्तीक बंधपत्र व रु. २५,०००/- रकमेची जमानत देवून फौजदारी प्रक्रीया संहिता १९७३ कलम ४३७-अ नुसार पूर्तता करावी.

४. सदर प्रकरणात जप्त मुद्देमालाचा ताबा मुळ मालकास देण्यात आलेला आहे तो अव्हानाचा कालावधी संपल्यानंतर कायम करण्यात येतो.

( न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.)

SUCHITA HARAKCHAND RATHI

Digitally signed by SUCHITA HARAKCHAND RATHI
Date: 2026.05.18 17:32:50 +0530

दिनांकः १८-०५-२०२६

(एस. एच. राठी)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,कोर्ट नं. २ अंबड.

# CERTIFICATE

I affirm that, the contents of this P.D.F. file Judgment/order are same, word to word as per the original Judgment/order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | --- | K.M.Kudar |
| Court | --- | 2nd Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Ambad. |
| Date | --- | 18.05.2026 |
| Order signed by the Presiding Officer on | --- | 18.05.2026 |
| Order uploaded on | --- | 18.05.2026 |